31-03-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 30-03-2025 22:25 Page 1

निवडक

आगस, लोलये येथील मनोशोभा कलाघरांत ५ एप्रिल रोजी 'पालशेतची शेती' नाट्यप्रयोग

टीम दैनिक हेराल्ड

आगोंद, दि. ३० : रुद्रेश्वर पणजीतर्फे निर्मित आद्य स्त्री नाटककार स्व. हिराबाई पेडणेकर ह्यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी पालशेतची विहीर या नाटकाचा प्रयोग येत्या दि. ५ एप्रिल रोजी, संध्याकाळी ६.३० वाजता आगस, लोलयें येथील मनोशोभा कला घरांत होणार आहे.या नाटकाचे लेखन विजयकुमार नाईक यांनी केले असून प्रा. दीपक आमोणकर यांनी हे नाटक दिग्दर्शित केले आहे. पालशेतीची विहीर हे मराठी नाटक आद्य मराठी नाटककार स्व. हिराबाई पेडणेकर यांच्या संघर्षमय जीवनावर आधारित आहे. देवदासी समाजातील प्रतिभावंत कलाकार आणि नाट्य लेखक असलेल्या हिराबाईना एक यशस्वी नाट्य लेखक, गीतकार आणि गायक म्हणून कला क्षेत्रात स्वतःला प्रस्थापित करताना पुरुष प्रधान संस्कृतीचे आणि तत्कालीन उच्च धर्मियांचे चटके खात असे जीवन कंठाने लागले याचे विदारक दर्शन या नाट्य कृतीतून श्री विजयकुमार नाईक यांनी केले आहे. त्याच बरोबर १९ व्या शतकांतील रुढी परंपरावादी सामाजिक परिस्थितीचा सुधारणावादी दृष्टीकोन बाळगून हिराबाई यांनी महिला सशक्तीकरणासाठी जी मुहूर्तमेढ रोवली त्यांचे प्रभावशाली सादरीकरण या नाटकाद्वारे करण्यात आले आहे. हे नाटक म्हणजे एका महिलेचा संघर्षमय इतिहास नसून संपूर्ण महिला वर्गाला नवीन उर्जा देण्याचा एक नवा आविष्कार आहे. या नाटकात श्री दिपक किंजवडेकर, दिपक आमोणकर, माधुरी शेटकर, अशोक परब, डॉ. रूमचा आमोणकर, गौरी पांगम, कुणाल धारगळकर, योगेश जोशी, संगम चोडणकर, यांच्या प्रमुख भुमिका आहेत. योगेश कापडी यांचे संगीत, सतीश नार्वेकर, यांची प्रकाश योजना, एकनाथ नाईक यांची रंगभूषा आणि रुद्रेश्वर पणजी यांची निर्मिती असलेल्या या नाट्य प्रयोगचा लाभ घेण्याचे आवाहन मनोशोभा कलाघरतर्फे श्री संदेश प्रभुदेसाई यांनी केले आहे.

कायसूव येथे आज सत्यनारायण महापूजा

टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ३० : श्री मुड्डेश्वर ब्राम्हण देवस्थान झर मुड्डी वाडा कायसुव येथे सोमवार दि. ३१ मार्च रोजी सार्वजनिक श्री सत्यनारायण महापूजा होणार आहे. यानिमित्त सकाळपासून धार्मिक विधी, सकाळी दहा वाजता पाच दांपत्य यजमानाने श्री सत्यनारायण महापूजा, नंतर महाआरती तीर्थप्रसाद व दुपारी महाप्रसाद होणार आहे. संध्याकाळी सात वाजता धुपारती व रात्र आठ वाजता श्री वनदेवी संगीत संस्था कायसुव आयोजित भजन सादर केले जाईल. गोमंतकातील प्रसिद्ध कलाकार वेदेश बाणावलिकर, चंद्रहास कवळेकर व सरोज दि वकर यांचा सहभाग असेल. त्यानंतर फळांच्या पावणीने उत्सवाची सांगता होईल.

गणेश शिशूवाटिका संस्थानात 'किलबील' उन्हाळी शिबिराचे आयोजन

टीम दैनिक हेराल्ड

म्हापसा, दि. ३० : गोवा विद्या प्रतिष्ठान संचालित श्री गणेश शिशूवाटिका गणेशपुरी म्हापसा या संस्थेने या उन्हाळ्याच्या सुट्टीत लहान मुलांसाठी 'किलबिल' उन्हाळी शिबिर आयोजित केले आहे. श्री गणेश शिशेवाटिका ही नवीन रा÷÷÷ष्ट्रीय शैक्षणिक २०२० राबविण्यात एक प्रयोगशील शिशु वाटिका असून मुलांच्या समग्र विकासासाठी या शाळेत अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम वर्षभर आयोजित केले जातात. सुंदर उद्यान जलतरण होद अनेक शैक्षणिक साधने असलेले १३ अध्ययन कोपरे हे या शिशुवाटिकेचे वैशिष्ट्य असून उत्तम शिक्षकांची साथ लाभल्याने अल्पावधीतच एक आदर्श शिशूवाटिका म्हणून ओळखले जाते गोव्याचे मुख्यमंत्री माननीय प्रमोदजी सावंत यांनीही शाळेविषयी कौतुकाचे उद्गार काढले आहेत नवीन राष्ट्रीय धोरण २०२० अंतर्गत दिल्या जाणाऱ्या कृतिशील आणि आनंद आणि शिक्षणाचे अनुभवते चिमुकल्या मुलाने घ्यावी म्हणूनच संस्कार आणि खेळ व याचा मेळअसलेला किलबिल या खास आयोजन करण्यात आले आहे हे शिबिर ७ एप्रिल ते १३ एप्रिल या कालावधी सकाळी नऊ ते ११:३० पर्यंत घेतले जाईल या शिबिरा स्तोत्र प्रार्थना बाहुल्यांचा खेळ नाट्य नृत्य हस्तकला चित्रकला कथाकथन विज्ञान प्रयोग संगीत योग प्राणायाम अशा विविध विषयांचा अंतर्भाव केला आहे या शिबिरावर अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले असून दिनांक १३ एप्रिलला होणाऱ्या समारोप समारंभ विद्यार्थ्यांना प्रशासित पत्रके प्रदान करण्यात येतील तीन ते सहा वयोगटातील कोणताही शाळांचे विद्यार्थी या शिबिराज सहभागी होऊ शकतात शिबिरासाठी ५०० रुपये हे शुल्क ठेवण्यात आले आहे प्रथम नोंदणी करणाऱ्यांना प्रथम यानुसार एकूण ५० विद्यार्थ्यांना या शिबिरात प्रवेश दिला जाईल शिबिरा नाव नोंदणी करण्यासाठी ८४११८४९४४१, ८७६७३२७९७८ या क्रमांकावर संपर्क साधला येईल विद्या प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉक्टर राजेश भटकुर्से आणि प्राचार्य अनिल सामंत यांच्या मार्गदर्शनाखाली चालणाऱ्या किलबिल या शिबिर सहभागी होऊन नव्या आनंदाने वातावरणात व अर्थपूर्ण शैक्षणिक अनुभवलेल्या लाभ घ्यावा असे आवाहन श्री गणेश विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका गौतमी गावस यांनी केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयाचा ९३ टक्के निकाल

टीम दैनिक हेराल्ड

म्हापसा, दि. ३० : कोलवाळ येथील डॉक्टर आंबेडकर उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावीचा निकाल ९३ टक्के लागला. कला शाखेचा निकाल शंभर टक्के तसेच वाणिज्य, फॅशन डिझाईनचा निकाल शंभर टक्के लागला असून ऑफिस मॅनेजमेंट निकाल ८७% ऑटो इंजिनिअरिंगचा निकाल ७३ % लागला कला शाखेत कुमारी संगम कुमारी यादव ८८ % टक्के गुण मिळवून प्रथम आली. वाणिज्य शाखेत आर्यन शेंडे ७९ टक्के गुण मिळवून प्रथम आला संकेत हळर्णेकर ७९ टक्के मिळवून प्रथम आला. ऑफिस मॅनेजमेट श्रेया बोरकर ८६ टक्के गुण प्रथम आली, ऑटो इंजिनिअरिंग मध्ये कार्तिक चारी ७६ टक्के मिळवून प्रथम आला फॅशन डिझाईन मध्ये श्रुती कडवी ७५ टक्के गुण मिळवून प्रथम आली. डॉ. आंबेडकर विद्यालयाचे प्राचार्य विठ्ठल पार्सेकर तसेच चेअरमन विठ्ठल पवार यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे

महामार्ग कामगार मूलभूत सुविधांपासून वंचित

मूलभूत सोयीसुविधांचा अभाव : आरोग्याच्या समस्यांमध्ये वाढ : स्थानिकांमध्येही चिंता

टीम दैनिक हेराल्ड

फोंडा, दि. ३० : फर्मागुडी येथे सुरू असलेल्या महामार्ग विकास प्रकल्पात कार्यरत असलेले कामगार गेल्या काही महिन्यांपासून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत राहत आहेत. मूलभूत सोयीसुविधांचा अभाव असल्याने त्यांच्या आरोग्याच्या समस्यांमध्ये वाढ होत असून, या परिस्थितीने स्थानिक रहिवाशांमध्येही चिंता निर्माण केली आहे.

जीव्हीएम उच्च माध्यमिक शाळेसमोर, फर्मागुडी येथील रस्त्याच्या कडेला या कामगारांना तात्पुरत्या स्वरूपातील प्लास्टिक कव्हर असलेल्या तंबूंमध्ये राहावे लागत आहे. विशेषतः स्वच्छतागृहे आणि स्नानगृहांची कोणतीही सुविधा नसल्याने महिलांसह सर्वच कामगारांना असुविधांचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते विराज सप्रे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना हस्तक्षेप करून कंत्राटदाराला कामगारांसाठी योग्य निवासस्थान व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्याची मागणी केली आहे.

या कामगारांच्या वास्तव्यामुळे शेजारील शाळेतील विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनाही अस्वस्थता वाटत असून, काही जणांनी उघड्यावर शौचास जावे लागण्याच्या परिस्थितीवर चिंता व्यक्त केली आहे. ही परिस्थिती सार्वजनिक आरोग्यासाठी घातक ठरू शकते. वाढत्या तापमानामुळे तंबूमध्ये राहत असलेल्या कामगारांना उष्णतेचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

कामगारांनी सांगितले की, सध्या रस्त्याच्या कडेला सुमारे अकरा जोडपी राहत असून, पुरुषांना दिवसाला ५५० रुपये आणि महिलांना ४५० रुपये मजुरी दिली जाते. मात्र, त्यांच्या निवासासाठी कोणत्याही सोयी उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. या मुद्द्यावर प्रतिक्रिया देताना विराज सप्रे म्हणाले की , आम्ही विकासकामांना विरोध करत नाही. मात्र, विकास प्रकल्पांवर कोट्यवधी रुपये खर्च केले जात असताना कामगारांना किमान राहणीमान व मूलभूत सुविधा तरी मिळायला हव्यात. या परिस्थितीची तातडीने दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांनी कामगारांसाठी योग्य निवासव्यवस्था, शौचालये आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी स्थानिकांकडून केली जात आहे.

सिंधुदुर्गमधील ड्रग्ज तस्कराला गोव्यात अटक

टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ३० : गोवा पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी सेलने (एएनसी) आंतरराज्यीय अमली पदार्थ तस्करीविरोधात मोठी कारवाई करत आंतरराष्ट्रीय बाजारात २५.१० लाख रुपये किमतीच्या कृत्रिम अमली पदार्थांच्या साठ्यासह एका आरोपीला अटक केली आहे.

सिंधुदुर्गमधील कुडाळ येथील रहिवासी परवेज अली खान (३०) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, पत्रादेवी येथील चेकपोस्टजवळ त्याला रंगेहाथ पकडण्यात आले. प्राथमिक तपासात खान हा मोठ्या अमली पदार्थ तस्करी नेटवर्कचा भाग असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

पोलिसांनी खानच्या ताब्यातून २०८ ग्रॅम एक्स्टेसी पावडर आणि ४३ उच्च-शक्तीच्या एक्स्टेसी गोळ्या जप्त केल्या आहेत. या अमली पदार्थांचा वापर मुख्यतः पार्टी सर्किटमध्ये होतो, असे एएनसीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. आरोपी मुंबईहून मोठ्या प्रमाणात एक्स्टेसी गोळ्या गोव्यात पुरवठा करत होता आणि स्थानिक पातळीवर त्यांचे वितरण करण्यात येत होते.

गोव्यातील पर्यटन हंगाम आणि लांब सुट्टीच्या पार्श्वभूमीवर अमली पदार्थांची मागणी वाढते. त्याचाच गैरफायदा घेत आरोपी मोठ्या प्रमाणावर ड्रग्स पुरवठा करत होता, असे एएनसीच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणाचा तपास एएनसीचे एसपी टिकम सिंग वर्मा आणि डीवायएसपी नेरलॉन अल्बुकर्क यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे.

सध्या आरोपीला पोलिस कोठडी देण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे. अमली पदार्थ विरोधी मोहिमेअंतर्गत गोवा पोलिसांकडून अशा कारवाया सुरूच राहतील, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

संसदेत विरोधकांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न : खा. विरियातो

टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. ३० : संसदेत विरोधकांना बोलण्याची संधी दिली जात नसल्याबद्दल दक्षिण गोव्याचे खासदार कॅप्टन विरियातो फर्नांडिस यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. याच पार्श्वभूमीवर, ते तियात्रला युनेस्को दर्जा मिळावा यासाठी लोकसभेत खाजगी सदस्य ठराव सादर करू शकले नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

लोकसभेत नियम १९३ अंतर्गत तातडीच्या सार्वजनिक विषयांवर चर्चा होत नसल्याची टीका करत, फर्नांडिस म्हणाले की , गोव्याच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा भाग असलेल्या तियात्राने १७ एप्रिल रोजी १३३ वर्षे पूर्ण केली. त्याला युनेस्कोचा दर्जा मिळावा, यासाठी मी खाजगी सदस्य ठराव मांडू इच्छित होतो. मात्र, सततच्या अडथळ्यांमुळे तो सादर करणे शक्य झाले नाही.

ते पुढे म्हणाले की, तियात्र हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे. त्याद्वारे महत्त्वाचे सामाजिक संदेश दिले जातात. त्यामुळे गोवा सरकारने ज्येष्ठ तियात्र कलाकारांसाठी पेन्शन योजना सुरू करावी आणि या कलेला प्रोत्साहन देण्यासाठी राज्याच्या वतीने आर्थिक सहाय्य करावे, अशी मागणी या ठरावात करण्यात आली होती.

फर्नांडिस यांनी आरोप केला की, संसदेत विरोधी पक्षाच्या सदस्यांना बोलण्यास मर्यादित संधी दिली जात आहे. इंडिया ब्लॉकमधील विरोधी पक्षांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना १२ कलमी पत्र सादर करून विरोधकांचे मायक्रोफोन बंद करणे आणि अर्थसंकल्पीय चर्चेतून महत्त्वाच्या मंत्रालयांना वगळणे यांसारख्या मुद्द्यांवर चिंता व्यक्त केली आहे.

ते म्हणाले, सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना मोकळेपणाने बोलण्याची संधी मिळते, तर विरोधकांना सातत्याने रोखले जाते. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना स्पष्टीकरण न देता अनेकदा बोलण्याची संधी नाकारण्यात आली आहे. हे संसदीय लोकशाहीच्या परंपरांचे उल्लंघन आहे.

फर्नांडिस यांनी सरकारवर कामकाज सल्लागार समितीच्या निर्णयांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप केला. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अलीकडील विधानाचा संदर्भ देत सांगितले की, पंतप्रधानांनी कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय आणि वेळापत्रकाविना सभागृहात भाषण केले, जे संसदीय प्रक्रियेला धरून नाही.स्थगन प्रस्तावांना वारंवार नकार देणे , संसद टीव्हीवर विरोधी पक्षाच्या सदस्यांचे भाषण न दाखवणे, संसदीय सल्लागार समितीच्या बैठका नियमितपणे न होणे, २०१९ पासून लोकसभेत उपसभापतींची नियुक्ती न होणे या आणि अन्य गोष्टींकडे खा. विरियातो यांनी लक्ष वेधले.

फर्नांडिस यांनी यावर स्पष्ट मत व्यक्त करत म्हटलेकी, लोकसभेतील उपसभापतींची नियुक्ती न करणे हे संसदीय लोकशाहीसाठी धोकादायक आहे. त्यामुळे इंडिया ब्लॉकमधील सभागृह नेत्यांनी लोकशाही प्रक्रियेचे संरक्षण करण्यासाठी योग्य ती पावले उचलावीत, अशी मागणी आम्ही सभापतींकडे केली आहे.

बेकायदेशीर बांधकामांवर कारवाई करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. ३० : दक्षिण गोवा जिल्हाधिकारी एग्रा क्लीटस यांनी सर्व उपजिल्हाधिकाऱ्यांना गोवा जमीन महसूल संहिता, १९६८ अंतर्गत बेकायदेशीर बांधकामांविरोधात तातडीने कठोर उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यात कुचराई केल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

राज्यात मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर बांधकामे सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाने स्वतःहून याची दखल घेत संबंधित यंत्रणेला तातडीने कारवाईचे आदेश दिले होते. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व उपजिल्हाधिकाऱ्यांना आपल्या तालुक्यात विशेष फ्लाइंग स्क्वॉड स्थापन करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

प्रत्येक तालुक्यात तयार होणाऱ्या फ्लाइंग स्क्वॉडमध्ये एक पोलिस निरीक्षक, मामलतदार, तलाठी आणि ब्लॉक डेव्हलपमेंट ऑफिसचा प्रतिनिधी यांचा समावेश असेल. तसेच, नागरिकांच्या तक्रारी तत्काळ नोंदवण्यासाठी प्रत्येक स्क्वॉडला अधिकृत व्हॉट्सॲप क्रमांक देण्यात येणार आहे. हा क्रमांक ५ एप्रिलपासून सक्रिय होईल.

नागरिक ३० शब्दांपेक्षा कमी मजकुरात व्हॉट्सॲपद्वारे तक्रार नोंदवू शकतात. तक्रारीसोबत बेकायदेशीर बांधकामाचे छायाचित्र अथवा व्हिडिओ आणि स्थानाचा तपशील द्यावा लागेल. हा क्रमांक विशेषरित्या नियुक्त अधिकाऱ्याद्वारे व्यवस्थापित केला जाईल, तसेच प्राप्त तक्रारी त्वरित संबंधित अधिकाऱ्यांना फॉरवर्ड केल्या जातील.

फ्लाइंग स्क्वॉडने प्राप्त तक्रारीवर एका तासाच्या आत कारवाई करणे अनिवार्य असेल. जर दिलेल्या वेळेत प्रतिसाद मिळाला नाही, तर तक्रार अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवता येईल. संबंधित अधिकारी तातडीने हस्तक्षेप करून अनधिकृत बांधकाम थांबवण्याची जबाबदारी पार पाडतील.

तालुका स्तरावर उपजिल्हाधिकारी आणि ब्लॉक डेव्हलपमेंट ऑफि यांना दर सोमवारी जिल्हाधिकाऱ्यांकडे साप्ताहिक अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या अहवालात प्राप्त तक्रारींची संख्याश, त्यावर झालेल्या कारवाईचा तपशील आणि संबंधित उपाययोजनांचा समावेश असेल. तसेच, प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत मासिक अनुपालन अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या मोहिमेमुळे गोव्यातील अनधिकृत बांधकामांना आळा बसण्यास मदत होणार असून, प्रशासनाच्या कारवाईत अधिक पारदर्शकता येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

कांदोळीच्या रहिवाशाला २.६ लाखांना लुटले !

टीम दैनिक हेराल्ड

कळंगुट, दि. ३० : कांदोळीमधील रहिवासी मॅन्युएल फर्नांडिस यांना मोटरसायकल कुरिअर डिलिव्हरीच्या बहाण्याने २.६ लाख रुपयांना गंडा घालण्यात आला. एका अज्ञात व्यक्तीने ग्राहक समर्थनासाठी 'एपीके' ॲप्लिकेशन इन्स्टॉल करण्यास सांगून त्यांना आर्थिक फसवणुकीचा बळी बनवले.

फर्नांडिस यांनी जानेवारी महिन्यात मध्य प्रदेशातील एका सेवा केंद्रात त्यांची यामाहा मोटरसायकल दुरुस्तीसाठी पाठवली होती. दुरुस्तीनंतर ती कुरिअर सेवेद्वारे परत पाठवण्यात आली. डिलिव्हरी प्रक्रियेदरम्यान, एका अनोळखी व्यक्तीने त्यांच्याशी संपर्क साधून, मोटरसायकल लवकर मिळण्यासाठी ग्राहक समर्थन 'एपीके' ॲप इन्स्टॉल करण्यास सांगितले.

ॲप डाउनलोड केल्यानंतर, संबंधित व्यक्तीने त्यांना चाचणी म्हणून केवळ १ रुपया पाठवण्यास सांगितले. मात्र, काही वेळानंतर फर्नांडिस यांना त्यांच्या बँक खात्यातून २.६ लाख रुपये परस्पर काढल्याचे लक्षात आले. त्या व्यक्तीशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, तो शक्य झाला नाही. यामुळे फसवणुकीची जाणीव होताच, त्यांनी तातडीने कळंगुट पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

फर्नांडिस यांच्या तक्रारीनंतर, अज्ञात व्यक्तीविरुद्ध माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे. ही घटना २ ते ३ फेब्रुवारी दरम्यान घडल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

दरम्यान, नुकत्याच झालेल्या सायबर गुन्हे प्रतिबंधक जागरूकता मोहिमेदरम्यान, कळंगुट पोलिस ठाण्याचे सायबर गुन्हे शाखेचे पीआय दीपक पेडणेकर यांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले होते. कोणत्याही अनोळखी लिंक्स किंवा 'एपीके' फाइल्स डाउनलोड करू नका. अशा ॲप्समुळे तुमच्या मोबाइलवरील सर्व माहिती हॅकर्सना मिळू शकते आणि बँक खात्यांवर अनधिकृत प्रवेश मिळवता येतो, असा इशारा त्यांनी दिला.

सायबर सुरक्षेसाठी पोलिसांकडून नागरिकांना नियमितपणे जागरूक केले जात असले, तरी अशा फसवणुकीचे प्रकार वाढत असल्याने सतर्क राहणे गरजेचे आहे.

मडगाव नगरपरिषदेच्या वसुलीत दिरंगाई

थकबाकी ३८ कोटीच्या उंबरठ्यावर

टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. ३० : वाढत्या आर्थिक संकटाच्या छायेत असताना, मडगाव नगरपरिषदेची एकूण महसुली थकबाकी ३६.८३ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. मात्र, वसुलीच्या प्रयत्नांत फारशी प्रगती होत नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

नगरपरिषदेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, थकबाकीदारांना नोटीस देण्यासाठी तीन पथके तैनात करण्यात आली असून, ही पथके घरे तसेच व्यावसायिक आस्थापनांना भेटी देत आहेत. तथापि, वसुलीचा दर अत्यंत समाधानकारक नसून, सरासरी प्रतिदिन केवळ २ लाख रुपये इतकाच महसूल जमा होत आहे.

वसुली मोहिमेच्या प्रगतीबाबत माहिती मिळवण्यासाठी संपर्क साधला असता, मुख्य अधिकारी मेल्विन वाझ आणि इतर पालिका अधिकारी कोणतीही ठोस आकडेवारी देण्यास तयार नव्हते. दरम्यान, एमएमसीचे अध्यक्ष दामोदर शिरोडकर यांनी वसुली मोहीम प्रभावीपणे सुरू असल्याचा दावा केला.वसुली प्रक्रियेत अडथळा आणणाऱ्या प्रमुख कारणांमध्ये व्यवसाय स्थलांतर, मडगावच्या अधिकारक्षेत्राबाहेर राहणारे रहिवासी आणि त्यांच्या मालमत्तांची होणारी दुर्लक्ष यांचा समावेश आहे. यामुळे महसुली थकबाकी वाढत असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे.

नगरपरिषदेच्या नोंदीनुसार, २०२०-२१ आर्थिक वर्षात थकबाकी २४.५९ कोटी रुपये होती, जी २०२१ -२२ मध्ये २५.७७ कोटींवर पोहोचली. २०२३ - २४ पर्यंत ती आणखी वाढून २७.७२ कोटी रुपये झाली, त्यातील २१ कोटी रुपये घर कर आणि स्वच्छता कराच्या रूपात होते.

मात्र, गेल्या चार महिन्यांत थकबाकीत जवळपास १०.५ कोटी रुपयांची वाढ झाली असून, ११ जुलै २०२४ र्यंत ती ३८.१९ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. महसुली गळतीला आळा घालण्यासाठी, नगरपरिषदेकडून याच कालावधीत शहरभर व्यापार परवान्याशिवाय चालणाऱ्या १४१ कायदेशीर आस्थापनांचे अस्तित्व उघडकीस आणले आहे.

अध्यक्ष शिरोडकर यांनी याबाबत बोलताना स्पष्ट केले की, दररोज फक्त १.५ ते २ लाख रुपये वसूल होत असून, वाढत्या थकबाकीच्या तुलनेत ही रक्कम अत्यंत तुटपुंजी आहे. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने पुष्टी केली की तीन स्वतंत्र पथके सर्व वॉर्डांमध्ये वसुली प्रक्रिया राबवत आहेत. तथापि, मुख्य अधिकाऱ्यांनी विशिष्ट तपशील देण्यास नकार देत जबाबदारी अन्य अधिकाऱ्यांवर टाकल्याचे समोर आले आहे.